# ग्रामीण रोजगार हमी योजनेतील राजकारण

**प्रा. डॉ. कल्पना आर. टेकाडे**
सहयोगी प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, भामटी, रिंग रोड, नागपूर 22.

★★★

**प्रास्तावना** :— ग्रामीण रोजगार हमी योजनेची बीजे सर्वप्रथम महाराष्ट्रामध्ये उमजली गेली. महाराष्ट्राचे तत्कालीन विधान परिशदेचे अध्यक्ष व महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध विचारवंत कै. विलास सखाराम पागे यांनी रोजगार हमी योजनेची आखणी केली व या योजनेची प्रत्यक्ष कृती ही 1969 मध्ये सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील विसापूर गावात सुरू केली.

ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजुर, बेरोजगार ही मंडळी प्रामाणिकपणे कष्ट करू इच्छिते. पण त्यांच्या हातामध्ये कोणतेही काम करण्याचे साधन नाही. कोणत्याही रोजगाराची हमी नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीस सरकारने कामाची हमी दिली पाहिजे असे श्री पागे यांना वाटू लागले. त्यादृष्टिने "मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम" हा कायदा संमत करण्यात आला. व या कायद्याने बेरोजगार व्यक्तीस काम मिळवून देणे सोयीस्कर झाले.परंतु, आपल्या देशात आर्थिक प्रगतीमध्ये तसेच उद्योगधंदे व सेवा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही. रोजगार हमी योजनेतुन ग्रामीण भागात वनीकरण, पाझर तलाव, शेततळे, मातीचे धरण, कालवे, तळ्यातील गाळ काढणे, जुन्या तळ्यांचे नुतनीकरण, रस्त्याचे रूंदीकरण, रस्ते, रोपवाटीका, वृक्ष लागवड अशा प्रकारचे अनेक कामे केली जातात. लोकशाही आणि 'रोहयो' या दोन्ही प्रक्रिया संपूर्ण देषाचे भवितव्य ठरविण्यासाठी असुन ही खऱ्या अर्थाने लोकशाहीत रूजलेली नाही. समाजातील राज्यकर्ते, बागायतदार, प्रशासकीय वर्ग, गावे पातळीवरील पुढारी वर्ग यांचा हस्तक्षेप या योजनेत होतांना दिसतो. यामुळे मजुरांना काम करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या लोकांच्या हस्तक्षेपामुळे रोजगार हमी योजना 'अर्ध्यात तुम्ही अध र्यात आम्ही' अशी अवस्था झाली आहे.

रोजगार हमी योजना चालु ठेवणे ही राज्यकर्त्या वर्गाची गरज आहे. कारण व्यापक हितसंबंध त्यांचे त्यामध्ये गुंतलेले आहेत. स्वतः पुरत्या विचारामुळे या योजनेचा फायदा प्रत्यक्ष मजुरांना होतांना दिसत नाही. मुळात ही योजना चांगली असली तरी याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होतांना दिसत नाही. ठराविक लोकांची मक्तेदारी 'रोहयो' मध्ये असल्याचा भास यातुन होतो. जगण्यासाठी जो ध ाडपडतो आणि प्रामाणिकपणे कष्ट करू इच्छितो असा सर्वसामान्य माणूस या योजनेचा गाभा आहे. या योजनेमुळे दीर्घकाळ टिकणारी सार्वजनिक मालमत्ता ही ठराविक लोकांच्या हातात जाणार असेल तर त्याद्वारे महाराष्ट्राच्या पर्यायाने देशाच्या फक्त मुठभर लोकांच्या हातात संपत्तीचा मोलाचा भर पडेल. मजुरांचा या योजनेच्या नावाखाली राजकीय हस्तक्षेप वाढत गेला तर याचा मजुरांना फायदा होणार नाही. यावर आज विचार करणे गरजेचे आहे.

**उद्दिष्ट्ये** :—

1) 'रोजगार हमी योजनेतील' राजकीय हस्तक्षेपाचा आढावा घेणे.

2) 'रोजगार हमी योजनेतील' मजुरांची होणारी उपेक्षांची कारण मिमांसा करणे.

3) 'रोजगार हमी योजनेमध्ये' होणाऱ्या भ्रष्टाचारा विषयी उपाययोजना सुचविणे.

**संशोधन पद्धती** :—या शोध निबंधासाठी संशोधकाने दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, लेख शोध प्रबंधाचा वापर केला आहे.

**"रोहयो" राजकीय हस्तक्षेप** :—रोजगार हमी योजनेत काम करणारा मजूर अल्पभूधारक व छोटा शेतकरी, शेतमजूर आहे. या लोकांकडुन शासकीय कामाऐवजी श्रीमंत शेतकरी, जमीनदार व मध्यम शेतकरी शासकीय अनुदानावरती स्वतः शेतातील कामे व इतर कामे करून घेतात. सरकारच्या खर्चावर आपल्या शेतावर आपले काम म्हणून मजुरांना आपल्या शेतावर राबवुन घेतात. या योजनेवर कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या सहकार्याने मजुरांचे कामे कागदपत्री दाखवून पैसा उखळतात. प्रत्यक्ष त्या कामाची मजुरांना माहिती नसते. अनेक पुढारी आमदार आणि अधिकारी हे संगनमत करून 'रोहयो' मधील मजुरांचे कामे टँकर, पोकलॅण्ड यासारखी मोठी अवजारे लावुन करतात व अव्वाच्या सव्वा खर्च दाखवून लुटालुट करतात. याचाच अर्थ हे लोक रोजगार हमी योजनेतील काम 'अर्धे तुम्ही व अर्धे आम्ही' या वाक्याप्रमाणे काम करून घेतात. म्हणजे या योजनेच्या मजुरांना फायदा होत नाही. याचा लाभ पुढारी, कंत्राटदार, आमदार आणि सक्षम अधिकारी या योजनेचा पैसा लुबाडतांना दिसतात. या योजनेची अधिकाऱ्यांना किंमत राहिलेली नाही. वास्तविक त्यांनी मष्दा व जलसंधारणाची कामे केली तर पाच वर्शात महाराश्ट्राचा चेहरा मोहरा बदलु षकेल.

**दृष्टीक्षेपात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना— महाराष्ट्र**

| अ. | तपशिल | परिणाम | वर्ष 2016–17 | वर्ष 2017–18 |
|---|---|---|---|---|
| 1. | जॉब कार्ड वितरीत केलेल्या एकूण कुटूंबाची संख्या | लाखात | 81.72 | 83.22 |
| 2. | मजुरी वाटपासाठी बँक / पोस्टात मजुरांची उघडण्यात आलेली एकूण खाती | लाखात | 68.48 | 68.42 |
| 3. | रोजगार उपलब्ध करून दिलेल्या एकुण कुटूंबाची संख्या | लाखात | 14.33 | 16.98 |
| 4. | रोजगार उपलब्ध करून दिलेल्या एकूण मजुरांची संख्या | लाखात | 27.26 | 31.40 |
| 5. | एकूण मनुष्य दिवस निर्मिती | लाखात | 708.99 | 825.32 |
| 6. | सरासरी प्रती कुटूंब मनुष्य दिवस निर्मिती | दिवस | 49 | 49 |
| 7. | 100 दिवसापेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यात आलेल्या कुटूंबाची संख्या | लाखात | 1.65 | 1.98 |
| 8. | एकूण खर्च. | कोटीत | 2083.12 | 2300.06 |
| 9. | मजुरी व साहित्यावरिल खर्चाचे प्रमाण | टक्के | 68.32 | 72.28 |
| 10. | चालु वर्षातील एकूण पुर्न कामे | लाखात | 1.61 | 2.21 |

स्त्रोत : *https://mahaegs.maharashtra.in/site/Hame/Hame/Index.aspx*

**उपाययोजना** :– ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये काम करणाऱ्या मजुरांना अडचण म्हणून राजकीय हस्तक्षेप हा मोठा पेचप्रसंग उभा राहिला आहे. या संदर्भात शासनाला योजनेतील कार्यवाही सुबद्ध पद्धतीने राबविली जाण्यासाठी काही उपाययोजना सुचविण्यात येतील.

1) शासनाने रोजगार हमी योजना कंत्राटी पद्धतीनेन राबविता या योजनेची कामी सक्षम प्रशासकीय वर्गाच्या देखरेखी अंतर्गत करावीत. जेणेकरून मजुरांच्या कामात व मजुरी मध्ये भ्रष्टाचार होणार नाही.

2) रोजगार हमी योजना पारदर्शक बनविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण करावी.

3) शासन काही काळापासून बँक व पोस्ट ऑफीस मध्ये रोहयो मजुरांची पगार जमा करते. परंतु, जे कामे पोकलॅड, टॅक्टर यांच्या सह्याने करतात ते बंद करण्यात यावे.

4) रोजगार हमी योजनेमध्ये कामे केल्याचा तपशील ग्रामसभेत मजुरांच्या व गावकऱ्यांच्या समक्ष ग्रामसेवक व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांनी साद करावी.

5) रोजगार हमी योजना पातळीवर आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकार स्वतंत्र मंत्री, प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हाधिकारी यांची नियुक्ती असुनही रोहया पाहिजे तेवढी सक्षमपणे राबविली जात नाही याची कारणमिमांसा करावी.

***संदर्भ सूची*** :–


1. *पागे वि.स.– बेकारी निर्मुलनातून ग्रामीणविकास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, प्रस्ताविक आवृत्ती, 1989*
2. *क्षीरसागर व्ही.एस.– अस्सा हा महाराष्ट्र रोजगार व संबंधित कार्यक्रम के. सागर पब्लिकेशन, पुणे, 2005.*
3. *पेठे वसंत प्रभाकर,– गरिबी निर्मुलन आणि आर्थिक विकास 21 व्या शतकासाठी नवीन प्रतिमान, अर्थसंवाद, एप्रिल–जून 2006.*
4. *कविमंडन विजय– ग्रामीण विकासाचा एकत्मिक दृष्टिकोन नीती, कार्यक्रम आणि व्युहरचना, मंगेश प्रकाशन, नागपूर, 2006.*
5. *राजहंस बा.न.– रोजगार हमी योजनेमुळे आदिवासी मध्ये जागृती लोकराज्य, रोजगार हमी विशेषांक 1983.*
6. *देसाई दत्ता– महाराष्ट्रातील दुष्काळी मागोवा प्रकाशन, शांती भुवन, पुणे, मे, 1987.*
7. *साधु अरूण– जागतिकीकरणाचा झंझावत टिकुन राहिलेली पुरोगामी योजना, रोहयो लोकराज्य, मे, 2002.*
8. *सुधीर भोंगळे– विकासवाटा, सुज्ञान प्रकाशन, कोथरूड, पुणे. प्रथम आवृत्ती 20, ऑक्टोबर, 2005.*
9. *देसाई संदिप– भारतासमोर सध्या प्रश्न आहेत तरी कोणते? योजना, एप्रिल, 2004.*
10. *दैनिक लोकमत– दिनांक– 1 जानेवारी, 2010.*
11. *दैनिक सकाळ– दिनांक– 15 जानेवारी, 2010.*
12. *दैनिक लोकमत– दिनांक– 2 फेब्रुवारी, 2011. (विशेष पुरवणी)*
13. *https://Mahaegs.Maharashtra.in/site/Hame/Index.aspx*